# Khed News : खेड मधील 17 गावातील 89 टक्के मुलांना 'ग्राम बाल संरक्षण समिती' माहितीच नाही

वर्क फॉर इक्वॅलिटी संस्थेच्या मी शक्ती गटातील मुलांनी केलेल्या अभ्यासाच्या अहवालाची माहिती

By **Sudesh** On **मार्च 30, 2022**

पुणे ठळक बातम्या पिंपरी चिंचवड

Notifications Powered by iZooto




**एमपीसी न्यूज – खेड तालुक्यातील 17 गावांमधील 221 सदस्य व मुलांसोबत 'ग्राम बाल संरक्षण समिती' विषयी चर्चा केली असता त्यातील 89 टक्के जणांना बाल संरक्षण समिती म्हणजे काय हे माहीत नव्हते. तर ज्यांना माहीत होते त्यातील 87 टक्के सदस्यांनी बाल संरक्षण समितीच्या बैठका होत नाहीत अशी धक्कादायक माहिती दिली.**

एकीकडे समाजात बालविवाह, मुलांवरील हिंसा, शाळागळती असे सतत प्रमाण वाढत असतांना दुसरीकडे मात्र मुलांच्या हक्कांचे संरक्षण करणारी ग्राम बाल संरक्षण यंत्रणा कागदोपत्री आहे असे सदस्यांशी मुलांनी विचारलेल्या प्रश्नातून दिसले, म्हणून वर्क फॉर इक्वॅलिटी संस्थेच्या वतीने खेड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी अजय जोशी यांना ग्राम बाल संरक्षण समिती त्वरीत सक्रीय करा, गावात बालविवाह झाल्यास सरपंच आणि सदस्यांचे पद रद्द करा अशा आशयाचा मागण्यांचा मसुदा “बालकांचे हक्क – सर्वांची जबाबदारी ” या संस्थेच्या वतीने आयोजित अधिवेशनात दिला गेला. यावेळी वेगवेगळ्या गावांमधून 40 मुले अधिवेशनाला उपस्थित होती.

Notifications Powered by iZooto

अधिवेशनात उपस्थित मुलांनी त्यांच्या प्रश्नाविषयी मांडणी केली. मुलांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचा सार – निकिता गावडे (वय 17) – आदिवासी समाजाच्या मुलाच्या हक्काविषयी बोलयचं झालं तर मला पहिला प्रश्न पडतो कि खरच आदिवासी समाजाची मुलं या देशाचे नागरीक आहेत का? मी असं बोलते आहे कारण आमच्या समाजात बोटावर मोजण्या इतकीच मुलं सातवी ते आठवी पर्यंत शिकू शकतात. आमच्या समाजात 90 टक्के मुलींचे लग्न हे 18 वर्षाच्या आधीच होतात.

18 वर्ष तर खूप झाले 15, 16 वर्षातच होत आहेत, ज्या वयात त्या मुलींनी मजा मस्ती केली पाहिजे त्या वयात त्या मुली संसारच ओझ सांभाळत आहेत. असं नाही कि लोकांना कायदा माहीत नाही पण कायदा मोडला तरी काही होत नाही हे लोकांना आता पक्क माहीत पडलं आहे त्यामुळं लोक मुलींचा बालविवाह करायला घाबरत नाहीत. ऐका गावात बालविवाहाला मनाई केली तर मुलगी दुसऱ्या गावात घेऊन जातात आणि तिथं लग्न लाऊन देतात. आता मला प्रशिक्षणामधून हे माहीत पडलं कि मदत कोणाला मागायची. पण गावात जिथं मदत मागायची त्या गावात बाल संरक्षण समितीच नसेन तर मदत मागणार तरी कोणाला?

ज्योती (वय 13) – भटक्या समाजातील मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर आहे. आमचे आईवडील पोटापाण्यासाठी ऐका गावातून दुसऱ्या गावात जातात, आम्हीपण त्यांच्या मागं जातो. रोज शाळेत जात येत नाही आणि घरीसुद्धा शिक्षणाचं वातावरण नाहि त्यामुळं आम्ही कधी कधी शिक्षणात मागं पडतो आणि भटकंती मुळं आमच्याकडं कागदपत्रं पण नसतात.आम्हाला इतर मुलांसारख लिहीता वाचता येत नाही म्हणुन, मुलं अस्वच्छ राहतात म्हणुन तर कधी गावात राहणारी लोकं आम्हा उघड्यावर रहाणाऱ्या लोकांच्या मुलाना शाळेत घेत नाहीत, आम्हाला शिक्षणाचा हक्क नाही का? आमच्यावर जर अन्याय होत असेल तर आम्ही दाद मागायची कोणाला?

कार्तिक (वय 13) – शाळांमध्ये शिस्तीच्या नावाखाली मुलांना जी शिक्षा केली जाते त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. मुलांना याबद्दल बोलायचे असते पण मुलांना न घाबरता बोलण्यासाठी तशी जागा नाही. म्हणून ग्राम बाल संरक्षण समिती त्वरीत कार्यरत करा.

समीक्षा (वय 13) – माझ्या वायाच्याच 4 ते 5 मुलींची कोरोनाच्या काळात लग्न झाली. त्यांना लग्न करायचे नव्हते पण त्यांना मदत कोणाला मागायची हे माहीत नव्हते. जर माझ्या गावात ग्राम बाल संरक्षण समिती असती तर आज त्या मुली माझ्या सारख्याच शिक्षण घेत असत्या.
ग्राम बाल संरक्षण समिती त्वरीत कार्यरत करण्यासाठी खेड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी अजय जोशी यांनी संबंधीत अधिकाऱ्यांना समिती कार्यरत करून अहवाल दाखल करण्याच्या आदेशाचे पत्र काढले आहे, अशी माहिती वर्क फॉर इक्वॅलिटी संस्थेच्या संस्थापिका प्रभा विलास यांनी दिली.

गट शिक्षण अधिकारी जीवन कोकणे, बाल विकास प्रकल्प अधिकारी श्री वाघमारे, तालुका आरोग्य अधिकारी श्री. गाढवे कार्यकामाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्थाविक संस्थेचे संस्थापक प्रभा विलास यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन श्रद्धा तेलंगे यांनी केले. आभार स्नेहल ठक्कर यांनी मानले.

Notifications Powered by iZooto

Countdown of SSC Exam 2022 | EP12 | Dr. A. L. Deshmukh | ...

89 per cent children do not even know about 'Gram Bal Samrakshan Samiti' | breaking news in marathi | In 17 villages in Khed | latest marathi news | latest news in marathi | Latest Update | Local News | marathi news | mpc latest news | MPC news | PCMC News | pune city | Top Marathi news | Top News | trending news | एमपीसी न्यूज | ताज्या बातम्या | मराठी बातम्या

**Leave a comment**

© 2018 - MPC NEWS Private Limited - All Rights Reserved.

Notifications Powered by **iZooto**